**प्रेसनोट** दि. ३१/१२/२०२४

मुरबाड पोलीस स्टेशन,पोशि/सचिनउ दमले व पोनि मनोज दशरथ कामत यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने लाचेची रक्कम मागणी केल्याचा गुन्हा दाखल केले बाबत.

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :- | ठाणे |
| गुन्हा नोंद कमांक | :- | मुरबाड पो.स्टे.,ठाणे ग्रामीण<br>गु.र.नं. ३२६/२०२४ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :- | १) श्री. पोनि/ मनोज दशरथ कामत मुरबाड पोलीस स्टेशन जि. ठाणे<br>२) श्री. पोशि/३५३८ सचिन कारभारी उदमले मुरबाड पोलीस स्टेशन जि. ठाणे |
| मागीतलेली लाचेची रक्कम | :- | २,००,०००/-रू. |
| स्विकारलेलीलाचेचीरक्कम | :- | -- |
| थोडक्यात हकीगत | :- | यातील तक्रारदार यांचा भाचा यांचेविरुध्द मुरबाड पोलीस ठाणे येथे एका महिलेने दिलेल्या तक्रारी अर्जामध्ये तक्रारदार यांचा भाचा यांचेवर कोणतीही कारवाईन न करता सदरचा तक्रारी अर्ज निकाली काढून मदत करण्याकरीता यातील लोकसेवक पोनि/श्री. मनोज कामत यांनी लोकसेवक पोलीस शिपाई/सचिन उदमले यांना तक्रारदार यांचेकडे लाचेची रक्कम मागण्यासाठी प्रवृत्त केल्याने लोकसेवक श्री. सचिन उदमले यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी पोनि/श्री. मनोज कामत यांचे सांगण्यावरुन, पोनि/श्री. कामत यांचेकरीता व स्वत:करीता तक्रारदार यांचेकडे २,००,०००/- रु. लाचेची मागणी करुन व सदर लाचेची रक्कम लोकसेवक पोशि/सचिन उदमले यांनी स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आरोपी लोकसेवक श्री. मनोज कामत, पोलीस निरीक्षक व पोशि/३५३८ सचिन उदमले दोन्ही नेमणूक- मुरबाड पोलीस स्टेशन यांचेविरूध्द मुरबाड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३२६/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (सुधारित २०१८) चे कलम ७, ७अ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभाग करीत आहे. |

मार्गदर्शन अधिकारी- १) मा. शिवराज पाटील सो, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२) मा. सुहास शिंदे सो. अपर पोलीस अधीक्षक, करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३) मा. संजय गोविलकर सो. अपर पोलीस अधीक्षक, करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :-लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेतस्थळ :-acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई-मेलआयडी :- spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :-acbmaharashtra.net
५) टोलफ्री क्र. :- १०६४
६) दुरध्वनीक्रमांक :-०२२-२०८१३५९९

पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(अनुपमा खरे)
पोलीसनिरीक्षक
अॅन्टीकरप्शनब्युरो, ठाणे